छत्रपती शाहू महाराज संशोधन,प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) पुणे
प्रायोजित
कृषि माल निर्यात प्रशिक्षण कार्यक्रम २०२६- २७

.....

प्रस्तावना:

महाराष्ट्र राज्य कृषि माल निर्यातीमधील देशातील महत्वाचे राज्य आहे. द्राक्ष ,डाळिंब, केळी, आंबा, स्ट्रॉबेरी, संत्रा, पेरु, कांदा, मिरची , भाजीपाला व फुले या शेतमालाच्या निर्यातीमध्ये राज्य देशातील सर्वात जास्त निर्यात करणारे राज्य म्हणुन गणले जाते. तसेच राज्यातील मोठया प्रमाणावर साखर , कापुस, बिगर बासमती तांदुळ यांच्या निर्यातीसाठी मोठा वाव आहे. सद्यस्थिती कृषि माल निर्यात करणारे निर्यातदार हे व्यापारी निर्यातदार असुन शेतकरी निर्यातदार अगदी नगण्य आहे. शेतक-यांना तसेच सहकारी संस्था आणि शेतकरी उत्पादक कंपन्याचे सदस्य यांना शेतमाल निर्यातीचे पुरेसे ज्ञान नसल्याने शेतमालाची निर्यात करण्यास मर्यादा येत आहेत. सारथी संस्थेच्या लक्षित गटातील सदस्यांना शेतमाल निर्यातीचे प्रशिक्षण देऊन या प्रशिक्षणाच्या माध्यमातुन राज्यातील शेतक-यामधुन शेतकरी निर्यातदार घडविण्यासाठी प्रोत्साहन मिळण्यास मदत होणार आहे..

उद्देश:

कृषि माल निर्यात प्रशिक्षण कार्यक्रम -कृषि मालाचे या एक पर्यायी विक्री व्यवस्थेच्या माध्यमातुन लक्षित गटातील सदस्यांना रोजगार व स्वयंरोजगार निर्मितीस चालना मिळेल .

प्रशिक्षण कालावधी व क्षमता : ५ दिवसीय निवासी प्रशिक्षण

प्रशिक्षण ठिकाण : महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्यादित, पुणे

प्रशिक्षण शुल्क : विनामूल्य (सारथी पुणे प्रायोजित)

सारथी प्रायोजकत्व (स्पॉन्सरशीप) - प्रशिक्षणार्थी शुल्क प्रशिक्षणार्थीचे वतीने सारथी संस्थेद्वारा प्रशिक्षण केंद्रास अदा करण्यात येते.(प्रती प्रशिक्षणर्थी र. रू११५०५/- प्रमाणे)

प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थी संख्या :१००

लाभार्थी पात्रता:

१. प्रशिक्षणार्थी हा शेतकरी उत्पादक कंपनी सभासद व महाराष्ट्राचा रहिवासी असावा.
२. प्रशिक्षणासाठी पात्र व्यक्ती ही मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी या लक्षित गटातील असावी व शेतकरी उत्पादक कंपनीची सभासद असावी.
३. ज्या शेतकरी उत्पादक कंपनीची सभासद संख्या ३०० पेक्षा जास्त आहे. अशा शेतकरी उत्पादक कंपनीचे संचालक व सभासद प्रशिक्षणासाठी पात्र व्यक्ती असतील .
४. उत्पादक कंपनीची कंपनी कायदा २०१३ नुसार Register of Company (RoC) कडे नोंदणी झालेली असावी.
५. शेतकरी हा नाबार्ड /किंवा इतर शासकीय योजनेद्वारे प्रशिक्षणासाठी अनुदान प्राप्त शेतकरी उत्पादक कंपनीचा सभासद नसावा.
६. एका कंपनीतील जास्तीत-जास्त दोन व्यक्ती प्रशिक्षणासाठी सहभागी होऊ शकतात.

७. प्रशिक्षणासाठी सहभागी व्यक्ती मागिल ३ वर्षाचे वार्षिक उत्पन्न हे र रु ८ लाखापेक्षा जास्त नसावे

आवश्यक कागदपत्रांचा तपशिल :-

ऑनलाईन अर्ज करताना अर्जदाराने खालील कागदपत्राची पीडीएफ करून अपलोड करणे आवश्यक आहे. अपलोड केलेली सर्व कागदपत्र सुस्पष्ट व वाचनीय असावीत.

- शेतकरी उत्पादक कंपनी सभासद हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा
- कुणबी – मराठा करिता – कुणबी व कुणबी – मराठा, जातीचा दाखला
- मराठा करिता – शाळा सोडल्याचा दाखला अथवा जातीचा दाखला
- उत्पन्नाचा दाखला – तहसिलदार यांचा मागील वर्षाचा उत्पन्न दाखला ८.०० लाख रूपयांपेक्षा जास्त नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (Income Certificate)
- आधार कार्ड, जन्मदाखला अथवा शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र
- रहिवासी दाखला (Domicile Certificate)
- उत्पादक कंपनीची कंपनी कायदा २०१३ नुसार Register of Company (RoC) कडे नोंदणी झालेली असावी.
- कंपनीच्या भागधारकांची संख्या ३०० पेक्षा जास्त असावी . Register of Company (RoC) कडे जमा केलेली यादी जोडावी
- स्वयं घोषणापत्र - शेतकरी हा नाबार्ड /किंवा इतर शासकीय योजनेद्वारे प्रशिक्षणासाठी अनुदान प्राप्त शेतकरी उत्पादक कंपनीचा सभासद नसावा. शेतकरी उत्पादक कंपनी संचालक, सभासद व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे क्षमता बांधणी प्रशिक्षणाचा लाभ घेतलेला नसावा .

अपात्रतेचे निकष :

i) कागदपत्रे अपूर्ण असणे व विहित मुदतीत सादर न करणे .
ii) ऑनलाइन अर्ज भरताना खोटी किंवा चुकीची माहिती भरणे.
iii) सारथी अंतर्गत या उपक्रमातून या पूर्वी या प्रशिक्षणाचा लाभ घेतलेला असल्यास .
iv) प्रशिक्षणार्थी ज्या कंपनीचा सभासद आहे त्या कंपनीच्या भागधारकांची संख्या ३०० पेक्षा कमी असल्यास

प्रशिक्षणासाठी विहित नमुन्यातील ऑनलाइन अर्ज http;//sarthi.maharashtra.gov.in व https;//sarthi-mahamcdc.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. शेतकरी उत्पादक कंपनीच्या माध्यमातुन प्रशिक्षणासाठी ऑनलाइन अर्ज आवश्यक त्या कागदपत्रासह सादर करणे बंधनकारक आहे.